प्रेस रीलीज



## गोव्यातील पर्यटन प्रकल्पांना केंद्रातर्फे पाठिंबा देण्याची केंद्रीय पर्यटन मंत्री प्रल्हाद सिंग पटेल यांची खात्री

पणजी, 4 जुलै – माननीय केंद्रीय राज्य पर्यटन मंत्री श्री. प्रल्हाद सिंग पटेल यांनी आज केंद्रीय मंत्रालयातर्फे गोव्यातील पर्यटनविषयक मूलभूत सुविधा प्रकल्पांना पाठिंबा देणार असल्याची खात्री दिली. केंद्रातर्फे निधी देण्यात आलेले गोव्यातील प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्याची सुरुवात करण्यासाठी भेट देण्याचेही त्यांनी मान्य केले आहे.

श्री. पटेल यांनी गोवा पर्यटन विकास महामंडळाचे अध्यक्ष श्री. दयानंद सोपटे यांच्यासह पर्यटन सचिव श्री. जे. अशोक कुमार, राज्य सभा खासदार, श्री. विनय तेंडुलकर आणि इतरांना दिल्लीत चर्चेसाठी आमंत्रित केले होते. केंद्रातर्फे निधी देण्यात आलेल्या गोव्यातील पर्यटन प्रकल्पांविषयी आणि कोल्वा समुद्रकिनाऱ्याचे अग्रणी पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती.

गोवा टुरिझमने हाती घेतलेल्या विविध उपक्रमांविषयी श्री. पटेल यांना माहिती देण्यात आली व गोव्याला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनवण्यासाठी पाठिंबा देण्याची विनंती करण्यात आली.
श्री. पटेल यांनी यासंदर्भात आवश्यक तो सर्व पाठिंबा देण्याचे मान्य केले आणि केंद्रातर्फे निधी देण्यात आलेल्या पर्यटन प्रकल्पांच्या उद्‌घटानासाठी नजीकच्या भविष्यात गोव्याला भेट देण्याचेही मान्य केले.

यानंतर गोवा टुरिझमचे सचिव श्री. जे. अशोक कुमार यांच्या नेतृत्वाखाली गोवा टुरिझमच्या अधिकाऱ्यांनी केंद्रीय पर्यटन सचिव, भारत सरकार. श्री. योगेंद्र त्रिपाठी यांच्यासोबत कोल्वा समुद्रकिनाऱ्याचे अग्रणी पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यासंदर्भात तसेच त्यासाठी आवश्यक निधी निश्चित करण्याबाबत चर्चा केली.
केंद्रीय पर्यटन मंत्री या प्रकल्पाला चालू वर्षाअखेरपर्यंत मान्यता देण्याची शक्यता आहे.